# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १६/०१/२०२३ (सोमवार) सायंकाळ**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. उमरेड :– अल्पवयीन फिर्यादी/पिडीता वय १५ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे अप. क्र. ६९६/२०२१ कलम ३५४ (ड), ३४१ भादवि. सहकलम ०८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयातील अल्पवयीन फिर्यादी ही कॉम्प्युटरचे क्लास लावण्याकरीता गेली असता यातील आरोपी नामे– सुमित भिमराव मेश्राम, वय २१ वर्ष, रा. सेव ता. उमरेड याने फिर्यादीस म्हटले की, तु कुठे राहते तुझी जात काय आहे. असे विचारपूस केली असता काही वेळा नंतर फिर्यादी ही क्लास वरून घरी जात असतांना आरोपी हा तिच्या मागे मोटार सायकलने पाठलाग करून बोलण्याचा प्रयत्न केला फिर्यादीस लज्जास्पद वाटेल असे कृत्य करून विनयभंग केला.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे पोस्टे उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक १६/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. पांडे यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४(ड) भादवि. मध्ये ०६ महिने सश्रम कारावास व ३०००/–रू. दंड, दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस नायक ब. नं. ४८७ माधव काळे, पोलीस स्टेशन उमरेड पोलीस हवालदार ब. नं. २२४ रामदास कोराम यांनी मदत केली आहे.

# अपघातात मृत्यु

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील कोराडी रोड कोलार नदी पुला जवळ खापरखेडा येथे दिनांक दिनांक १४/०१/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान मारोती कार क्रं. एम. एच.— ०४ डी. आर.— १३६३ चा चालक आरोपी नामे—गौरव प्रेमचंद पनवेलकर, रा. पारशिवनी चे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन ॲक्टीवा गाडी क्रं. एम एच ३१/ई एल ९०५६ चा चालक मृतक नामे— मंगेश शेषराव कोहळे, वय ३३ वर्ष, रा. न्यु नांदा कोराडी हा त्याचे ताब्यातील गाडीने कोराडी कडुन खापरखेडा कडे येत असतांना ॲक्टीव्हा चे चालकास कार चालकाने समोरा समोर धडक मारून गंभीर जखमी केले. तसेच सदर चालकाने अपघात झाल्याबाबत पोलीसांना सुचना दिली नाही. तसेच घटनास्थळावरून पळुन गेला. जखमीचे डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याला उपचारकामी मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेवुन भर्ती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरकारतर्फे पोलीस उपनिरीक्षक जानुसिंग जाधव पोस्टे खापरखेडा मो. क्रं. ९९२३१०४३१० यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवि. सहकलम १८४, १३४ मो. वा. का. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश पिसे पो.स्टे. खापरखेडा मो. नं. ९८८१३७७३४८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**